## पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी

२ रा मजला, वैद्यकिय मुख्य कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी- ४११ ०१८.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) मधील १५ व्या वित्त आयोगांतर्गत नव्याने मंजूर नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रासाठी एकत्रित मानधनावर कंत्राटी पद्धतीने खालील पदे भरावयाची आहेत. याकामी खालीलप्रमाणे नमुद केलेल्या पदांकरिता शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | एकत्रीत मानधन | शैक्षणिक पात्रता व अनुभव | प्रवर्गानुसार आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | वैद्यकीय अधिकारी | ६७ | एम.बी.बी.एस. - ६०,०००/- प्रतिमहा व बी.ए.एम.एस- २५०००/- मानधन + १५,०००/- कामावर आधारीत मोबदला (पीबीआय). | १) एम.बी.बी.एस. पदवी किंवा बी.ए.एम.एस. उत्तीर्ण आवश्यक.<br>२) इंडियन मेडीकल कौन्सिलकडील किंवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कडील नोंदणी आवश्यक.<br>३) एम.बी.बी.एस. पदवीधारक उमेदवारांना प्राधान्य राहील.<br>४) अनुभव- Medical Council Registration झाल्याच्या दिनांकापासून पुढील अनुभव असल्यास प्राधान्य. | अ.जा.-०९<br>अ.ज.-०५<br>वि.जा.अ.-०२<br>भ.ज.ब. -०२<br>भ.ज.क.-०३<br>भ.ज.ड.-०१<br>वि.मा.प्र.-०१<br>इ.मा.व.-१३<br>एस.ई.बी.सी.-०७<br>आ.दु.घ.-०६<br>अराखीव-१८ |
| २ | स्टाफनर्स | ६७ | २०,०००/- प्रतिमहा | १) १२ वी उत्तीर्ण आवश्यक.<br>२) जी.एन.एम.किंवा बी.एस्सी.नर्सिंग उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडील नोंदणी आवश्यक.<br>४) स्टाफनर्स या कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | अ.जा.-०९<br>अ.ज.-०५<br>वि.जा.अ.-०२<br>भ.ज.ब. -०२<br>भ.ज.क.-०३<br>भ.ज.ड.-०१<br>वि.मा.प्र.-०१<br>इ.मा.व.-१३<br>एस.ई.बी.सी.-०७<br>आ.दु.घ.-०६<br>अराखीव-१८ |
| ३ | बहुउद्देशीय आरोग्य सेवक (एम.पी.डब्ल्यु.) (पुरुष) | ६७ | १८,०००/- प्रतिमहा | १) १२ वी सायन्स शाखेचा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) Paramedical Basis Training Course OR Sanitary Inspector Course उत्तीण असणे आवश्यक<br>३) बहुउद्देशीय आरोग्य सेवक (एम.पी.डब्ल्यु.) (पुरुष) या कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | अ.जा.-०९<br>अ.ज.-०५<br>वि.जा.अ.-०२<br>भ.ज.ब. -०२<br>भ.ज.क.-०३<br>भ.ज.ड.-०१<br>वि.मा.प्र.-०१<br>इ.मा.व.-१३<br>एस.ई.बी.सी.-०७<br>आ.दु.घ.-०६<br>अराखीव-१८ |

अटी व शर्ती-

१) **इच्छुक उमेदवारांनी दि.१२/०६/२०२४ ते दि.२१/०६/२०२४ रोजी (सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी- १०.०० ते सायंकाळी- ५.०० वाजेपर्यंत पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन, वैद्यकीय विभाग, दुसरा मजला, आवक-जावक कक्ष येथे वरील विहित मुदतीत समक्ष येऊन अर्ज सादर करावा. वरील कालावधीनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच सदर जाहिरातमधील रिक्त राहणा-या फक्त वैद्यकीय अधिकारी या पदाचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन, वैद्यकीय विभाग, दुसरा मजला, आवक-जावक कक्ष पिंपरी- ४११ ०१८ येथे आठवडयातील दर बुधवारी सकाळी-१०.०० ते ५.०० वाजेपर्यंत अर्ज स्वीकारण्यात येतील.**

२) इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर करताना अर्जासोबत १) वयाचा पुरावा २) पदवी/पदवीका प्रमाणपत्र ३) शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका ४) गुणपत्रिका CGPA पध्दतीची असल्यास अर्जा सोबत विद्यापीठाचे सरासरी श्रेणी पॉईंट रुपांतरण प्रमाणपत्र (CGPA Conversion Certificate) ५) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र ६) शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र ८) निवासी पुरावा ९) जातीचे प्रमाणपत्र १०) उमेदवाराचा सद्याचा पासपोर्ट साईजचा फोटो, या सह पिंपरी चिंचवड महानगरपालिका संकेतस्थळ www.pcmcindia.gov.in वरील आमच्या बद्दल ➡ नोकरी विषयी या सदरामध्ये जाऊन अर्जाची प्रिन्ट काढून सदरचा अर्ज परिपुर्ण भरुन सादर करावयाचा आहे.

३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची १५ व्या वित्त आयोगांतर्गत नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र सुरू होतील त्यानुसार टप्प्याटप्याने निवड/प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील.

४) उपरोक्त नमूद सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रीत मानधनाची असून सदरचा प्रकल्प बंद होताच सदरची पदे आपोआप संपुष्टात येतील.

५) मा.आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचेकडील पत्र क्र.राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/पदभरती १०६७०-११०१६/२०२३ दि.२७/०४/२०२३ अन्वये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध पदांच्या पदभरतीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना प्राप्त असून यामध्ये उमेदवारांना खालील प्रमाणे गुण देण्यात येतील.

६) **जाहिरातीमधील वैद्यकीय अधिकारी या पदे भरण्याकरिता सदर जाहिराती सोबत जोडण्यात आलेल्या Marking Pattern नुसार गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.**

७) **जाहिरातीमधील स्टाफनर्स व बहुउद्देशीय आरोग्य सेवक (एम.पी.डब्ल्यु.) (पुरुष) या पदांची गुणांकन पद्धतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबविली जाईल.**

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proportion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५० % प्रमाणे proportion = ६० * ५० / १०० = ३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घेतली जाईल) | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे proportion काढावे. (उदा.१. Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करून अतिरिक्त B.Sc. (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc. (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २० % प्रमाणे proportion = ६० * २० / १०० = १२ गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत.( १ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| **एकूण-** | | **१०० गुण** |

८) यानुसार गुणांकन केल्यावर गुणानुक्रमानुसार अधिकतम गुण मिळालेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर यादी बाबत आक्षेप असल्यास तीन दिवसांची मुदत देण्यात येईल. परंतु उमेदवाराने आवश्यक पुष्टयर्थ योग्य पुरावे सादर करणे बंधनकारक राहील.अशा प्रकारे प्राप्त आक्षेपांचे निराकरण करुन त्यानुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

९) सदरची पदे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत राहतील, सदर पदांचा पिंपरी चिंचवड म.न.पा. आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

१०) सदरची बीएएमएस वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती मा.सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील पत्र क्र.राआसो/१५th FC/UHWC/BAMS MO/१०७७३२-१०५१३५/२३ दि.०७ डिसेंबर २०२३ अन्वये प्राप्त खालील सुचनांनुसार करण्यात येईल.

- १५ वा वित्त आयोगा अंतर्गत नागरी आरोग्यवर्धीनी केंद्रातील वैद्यकिय अधिकारी म्हणून एम.बी.बी.एस पदवीधारकांच्या नियुक्तीला प्राधान्य देण्यासाठी केंद्र शासनाने सूचविले आहे. त्यानुसार नागरी आरोग्यवर्धीनी केंद्रातील वैद्यकिय अधिकारी पदांकरीता एम.बी.बी.एस पदवीधरकांची नियुक्ती करणेकरीता प्राधान्य देण्यात येईल.
- परंतू अनेक प्रयत्न करुनही एम.बी.बी.एस पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास, १५ वा वित्त आयोग अंतर्गत नागरीआरोग्य वर्धीनी केंद्राकरीता वैद्यकिय अधिकारी म्हणून एम.बी.बी.एस पदवीधारक उमेदवार उपलब्ध होई पर्यंत अथवा ६ ते ११ महिन्यांकरीता बी.ए.एम.एस. पदवीधारक उमेदवारांना वैद्यकिय अधिकारी म्हणून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.
- बी.ए.एम.एस पदवीधारक वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मनुष्यबळ विभागाचे दि.०९/०६/२०२३ रोजीचे पत्र जा.क्र.राआसोमु/मुनष्यबळ कक्ष/पदभरती /३४३५४-७०१/२०२३ नुसारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात येईल.
- बी.ए.एम.एस पदवीधारक वैद्यकिय अधिकारी पदांकरीता केंद्रशासनाच्या सीपीएचसी च्या मार्गदर्शक सूचनांनुसार रु. २५,०००/- अधिक रु. १५,०००/- (पीबीआय) कामावर आधारित मोबदला याप्रमाणे प्रती महिना रु.४०,०००/- मानधन मार्गदर्शक सूचनांनुसार अदा करण्यात येईल.

११) सदरची पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने प्रकल्पासाठी भरावयाची असुन सदर पदावरील उमेदवारांना प्रथम नियुक्ती दि.२९ जून पर्यंत देण्यात येईल व कामकाजाच्या अहवालानुसार दि.३० जून रोजी सेवेत खंड देवून दि.०१ जुलै पासून पुढील पुर्ननियुक्ती देण्यात येईल. याबाबत शासनाकडून प्राप्त मार्गदर्शक सूचना लागू राहतील. तसेच सदरचा प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील.

१२) सदरची नियुक्ती पुर्णपणे तात्पुरत्या (हंगामी) स्वरुपाची आहे. त्यामुळे अर्जदारास कायमपदी नियुक्तीचा हक्क सांगता येणार नाही ज्या दिवशी सोसायटीस सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय मानधनावरील सेवा समाप्त केली जाईल.

१३) सदरच्या जाहिरामधील पदांच्या संख्येमध्ये अथवा आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो.

१४) मा.आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचेकडील दि.२९/०९/२०१८ चे पत्रान्वये सदर पदासांठी उमेदवारांची सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील. तसेच सेवानिवृत्त उमेदवारांसाठी वैद्यकीय अधिकारी पदासाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्षा पर्यंत व इतर पदांसाठी कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल राहील परंतु वय वर्षे ६० नंतर जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारीरीक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१५) अर्जदार हा संबंधित पदासाठी शरीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१६) कौन्सिलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असणे आवश्यक आहे.

१७) सदरची भरती रद्द करणे अथवा स्थगीत करणे तसेच निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१८) अनुभवाच्या बाबतीत शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य व खाजगी संस्था यांचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल.

१९) उपरोक्त पदांकरिता असलेल्या सर्व सूचना, प्राथमिक गुणांकन यादी, हरकती स्विकारणे, अंतिम गुणांकन यादी हया बाबी महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. तथापी याबाबत उमेदवारास कोणतीही वेगळी सूचना अथवा दुरध्वनी, एस.एम.एस., ई-मेल केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्याकरिता उमेदवारांनी वेळोवेळी महापालिकेच्या संकेतस्थळास भेट देणे अनिवार्य राहील.

२०) उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदाचे नांव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावा.

२१) सदर पदभरती अंतर्गत निवड करण्यात येणा-या उमेदवारांकडून सदरचे पदावर कायमस्वरुपी हक्क सांगणार नसलेबाबत र.रु.१०० चे स्टॅम्प पेपरवर बंधपत्र भरुन देणे बंधनकारक राहील.

२२) सदर जाहिरातीमधील नमूद पदांची निवड समिती मार्फत निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल.

सही/-
(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८

जाहिरात क्र.२०/२०२४
दि. ११/०६/२०२४

## <u>उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना</u>

फोटो

प्रति,

मा. आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

**विषय – .......................................... या पदासाठी अर्ज**

**संदर्भ – जाहिरात क्रमांक- दि. - -२०२४**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय जाहिरातीनुसार मी राष्ट्रीय आरोग्य अभियानामधील १५ व्या वित्त आयोगांतर्गत कंत्राटी पध्दतीने ................................................... या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे. माझा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | माहिती | | |
|---|---|---|---|---|
| १ | संपुर्ण नाव | **आडनाव** | **नाव** | **वडील / पतीचे नाव** |
| २ | पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता | | | |
| ३ | ई-मेल | | मोबाईल क्र. | |
| ४ | जन्मतारीख | / / वय- वर्षे- महिने- दिवस- (जाहिरातीच्या दिनांकास अनुसरुन) | | |
| ५ | लिंग | पुरुष | स्त्री | |
| ६ | सद्यस्थितीत महापालिकेत कामकाज करीत आहे काय | होय / नाही | | |
| | होय असल्यास | दवाखान्याचे नाव - | पदनाम - | |
| ७ | जात - | जातीचा प्रवर्ग - | | |

| SC | ST | VJ (A) | NT (B) | NT (C) | NT (D) | OBC | SBC | SEBC | EWS | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

८ शैक्षणिक अर्हतेचा तपशील

| शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

९ तांत्रिक व इतर अर्हता तपशील

| अ.क्र. | संस्थेचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | कौन्सिलकडील नोंदणी बाबत | नोंदणी- आहे/नाही | नुतनीकरण- आहे/नाही | कालावधी- |

सदरची पदे ही कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपातील नेमणुकीची आहेत याची मला जाणीव असून याबाबत मी भविष्यात कोठेही व कोणताही दावा दाखल करणार नाही. वरीलप्रमाणे नमूद केलेली सर्व माहिती, तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी / चूकीची अथवा अपुरी असल्याचे आढळून आल्यास नेमणुकीच्या कोणत्याही टप्यावर या माहितीच्या आधारे महापालिका सेवेतून कमी करण्यास तसेच या भरतीकरीताच्या अपात्रतेस मी स्वत: जबाबदार राहिल. याबाबत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई देखील केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ - पिंपरी　　　　　　　　　　　　　　　　अर्जदाराची सही -

दि.　　/　　/२०२४　　　　　　　　　　　　　　अर्जदाराचे नाव ----------------------------

................................................................................................................................

सहपत्रे - अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

१) शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणपत्रे　　२) जन्मतारखेचा पुरावा　　३)अनुभवाची प्रमाणपत्रे

४) जात प्रमाणपत्र　　५) रहिवास पुरावा　　६) इतर कागदपत्रे.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८

## राष्ट्रीय आरोग्य अभियानामधील १५ व्या वित्त आयोगांतर्गत रिक्त पदे भरणे बाबत

**Post of M.B.B.S./B.A.M.S.**

**<u>Marking Pattern (Total Marks-25)</u>**

| उमेदवाराचे नाव - | अ.क्र. - |
|---|---|

**1. Mark for Performance in M.B.B.S./B.A.M.S. Final Examination (Total-10 Marks)**

| टक्केवारी | गुण | उमेदवाराने भरावयाचे | | कार्यालयीन कामकाजाकरिता |
|---|---|---|---|---|
| | | मिळालेले गुण व टक्केवारी | प्राप्त गुण | तपासणीअखेर प्राप्त गुण |
| 70% & Above | 10 Marks | | | |
| 65% to 69.99% | 8 Marks | | | |
| 60% to 64.99% | 6 Marks | | | |
| 55% to 59.99% | 4 Marks | | | |
| 50% to 54.99% | 2 Marks | | | |

Medical Council Registration झाल्याचा दिनांक ..............................

| अनुभव- Medical Council Registration झाल्याच्या दिनांकापासून पुढील अनुभव (Total 15 Marks) | | | | |
|---|---|---|---|---|
| एकूण वर्षे | गुण | अनुभव | प्राप्त गुण | तपासणीअखेर प्राप्त गुण |
| Above 5 Years | 15 Marks | | | |
| > 3 to 5 Years | 10 Marks | | | |
| 1 Years to 3 Year | 5 Marks | | | |

वरीलप्रमाणे नमूद केलेली सर्व माहिती बरोबर असून, ती मी स्वतः भरलेली आहे. कार्यालयीन तपासणीअंती मी नमूद केलेली माहिती व सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळून आल्यास, माझा अर्ज परीक्षा प्रक्रियेमधून अपात्र केला जाईल याची मला पूर्णतः जाणीव आहे.

उमेदवाराची स्वाक्षरी

( नाव - )

---

(कार्यालयीन कामकाजाकरिता)

(डॉ. लक्ष्मण गोफणे)
आरोग्य वैद्यकीय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

मा.आयुक्त सो यांचेकडील मान्य नमुना